


# इस्रायली वर्तमानपत्राच्या पहिल्या पानावर झळकले 'नमस्ते'

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे त्यांच्या दुसऱ्या इस्रायल दौऱ्यासाठी रवाना झाले असून या दोन्ही देशांचे संबंध भक्कम आहेत. या संबंधांना अधिक बळकटी मिळणार असून आणखी नवीन पैलू उलगडले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. अशातच इस्रायली वृत्तपत्र 'द जेरुसलेम पोस्ट'ने भारतीय पंतप्रधानांच्या स्वागतासाठी एक विशेष मुखपृष्ठ छापले आहे. वृत्तपत्राचे मुख्य संपादक झ्विका क्लेन यांनी मुखपृष्ठाचा फोटो एक्सवर शेअर केला आहे.

इस्रायली वृत्तपत्र 'द जेरुसलेम पोस्ट'चे मुख्य संपादक झ्विका क्लेन यांनी एक्सवर २४ फेब्रुवारी रोजी मुखपृष्ठाचा फोटो पोस्ट केला. त्यांनी म्हटले की, "पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या २०१७ नंतरच्या पहिल्याच इस्रायल दौऱ्यापूर्वी आम्ही उद्याचा पेपर जेरुसलेममध्ये छापण्यासाठी पाठवला आहे. या प्रसंगी आमचे 'द जेरुसलेम पोस्ट'चे हे खास कव्हर आहे. तुम्हाला काय वाटते?" तसेच त्यांनी पुढे बोलताना, त्यांच्या वाचकांना पंतप्रधानांचे स्वागत करण्यासाठी त्यांच्यासोबत सामील होण्याचे आवाहन केले. या मुखपृष्ठावर पंतप्रधान मोदींचा फोटो असून वर 'नमस्ते' असे देवनागरीमध्ये लिहिले आहे. याशिवाय आजूबाजूलाही इस्रायल आणि भारत यासंबंधीच्या बातम्या असल्याचे दिसत आहे.

बुधवारी, पंतप्रधान मोदी दुपारी ४ वाजता (भारतीय प्रमाणवेळेनुसार) इस्रायलमध्ये उतरतील. २०१७ नंतर मोदींचा हा पहिलाच इस्रायल दौरा आहे आणि ते इस्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांच्यासोबत द्विपक्षीय व्यापार, संरक्षण आणि सुरक्षा सहकार्यावर महत्त्वाच्या चर्चा करतील अशी अपेक्षा आहे. पंतप्रधान इस्रायली संसद, नेसेटला देखील संबोधित करतील.

>> पान...३ वर

> 'द जेरुसलेम पोस्ट'चे हे खास कव्हर आहे. तुम्हाला काय वाटते?" तसेच त्यांनी पुढे बोलताना, त्यांच्या वाचकांना पंतप्रधानांचे स्वागत करण्यासाठी त्यांच्यासोबत सामील होण्याचे आवाहन केले. या मुखपृष्ठावर पंतप्रधान मोदींचा फोटो असून वर 'नमस्ते' असे देवनागरीमध्ये लिहिले आहे.

राष्ट्रवादाचा बुलंद आवाज

# न्यूज डंका महाराष्ट्र

मुंबई । पुणे । नाशिक जिल्ह्यात एकाच वेळी वितरित होणारे दैनिक

मुख्य संपादक : दिनेश कानजी

मुंबई >> गुरुवार, २६ फेब्रुवारी २०२६ >> वर्ष ४ >> अंक २६६ >> पाने ६ >> किंमत ५ रुपये

## झटपट डंका

### एपस्टीन प्रकरणावरून बिल गेट्स यांची जाहीर माफी



जगातील प्रसिद्ध उद्योगपती आणि मायक्रोसॉफ्टचे सहसंस्थापक बिल गेट्स यांनी 'एपस्टीन फाइल्स' प्रकरणावरून त्यांच्या फाउंडेशनच्या कर्मचाऱ्यांची जाहीर माफी मागितली आहे. अलीकडेच काही अधिकृत कागदपत्रे सार्वजनिक झाल्यानंतर पुन्हा एकदा त्यांचे नाव अमेरिकन गुन्हेगार जेफ्री एपस्टीन याच्याशी जोडले गेले आणि त्यामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे.

>> पान...५ वर

### उंदरांपासून सुरक्षित राखण्यासाठी तो लावत होता, फळांना उंदरांचे विष; बसला चोप



आपली फळे सुरक्षित राखता यावीत म्हणून एक फळवाला चक्क फळांना उंदारांचे विष लावत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. त्यातून त्या फळवाल्याला मनसेच्या कार्यकर्त्यांनी चांगला चोप दिला आहे. मालाडमधील ही घटना आहे.

सर्वसामान्यांच्या आरोग्याशी खेळ करण्याच्या या प्रकारात दोन फळ विक्रेत्यांनी फळांना उंदीर मारण्याचे औषध लावल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला. राटोल हे विषारी औषध फळांवर हे फळवाले लावत असत. आता या दोन परप्रांतीय फळ विक्रेत्यांना मालाड पोलिसांनी अटक केली आहे.

>> पान...५ वर

### खाण विभागात काम करणाऱ्या अधिकाऱ्याच्या घरात सापडली 'पैशाची खाण'



ओडिशाच्या खाण विभागातील एका अधिकाऱ्याच्या घरातून ट्रॉली बॅगमध्ये भरलेली नोटांची बंडल्स जप्त करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी बुधवारी दिली. भ्रष्टाचार प्रकरणात अटक करण्यात आलेल्या या अधिकाऱ्याचे नाव देबब्रत मोहंती असून ते उपसंचालक (खाण) पदावर कार्यरत होते.

>> पान...३ वर

## आमदार अतुल भातखळकरांनी विधिमंडळात व्यक्त केला संताप

# शेतकऱ्याने किडनी विकली; आरोपींवर मकोका लावण्याची मागणी

टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com



> चंदपूरमधील एका शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेले कर्ज मुद्दल आणि व्याजासह फेडले तरीही त्याच्यावर किडनी विकण्याची वेळ आली. संबंधित शेतकऱ्यासह अन्य काहींना परदेशी पाठवून किडनी विकायला लावली. यातून सावकारी कर्जातून लोकांच्या फसवणुकीचे आणि छळ होत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. माणुसकीला काळिमा फासणारे आणि सुसंकृत महाराष्ट्राची मान खाली घालण्याचे हे प्रकरण आहे.
>
> – आमदार अतुल भातखळकर

### कर्जवसुलीच्या तगाद्याला कंटाळून...

संबंधित घटना २०२१ ते २०२३ मधली असून शेतकऱ्याने सहा जणांकडून कर्ज घेतले होते. पुढे शेतकऱ्याला कर्जवसुलीसाठी त्रास देण्यात आल्यानंतर त्याने पोलिसांत तक्रार केली आणि २०२५ मध्ये प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी तातडीने सहा जणांना अटक केली. मात्र, दरम्यान कर्जवसुलीसाठी शेतकऱ्याच्या मागे तगादा लावल्याने त्याने स्वतःची किडनी विकून कर्ज परतफेड केले.



राज्याचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सध्या सुरू असून या दरम्यान चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याने सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी किडनी विकण्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. लक्षवेधी प्रश्नाच्या माध्यमातून भाजपा आमदार अतुल भातखळकर यांनी यावरून राज्य सरकारला प्रश्न विचारत आरोपींवर 'मकोका' लावण्याची मागणी केली. त्याचबरोबर शेतकऱ्याची किडनी विकण्याच्या प्रकरणात विशेष न्यायालयात फास्टट्रॅक खटला सुरू करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

आमदार अतुल भातखळकर म्हणाले की, चंदपूरमधील एका शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेले कर्ज मुद्दल आणि व्याजासह फेडले तरीही त्याच्यावर किडनी विकण्याची वेळ आली. संबंधित शेतकऱ्यासह अन्य काहींना परदेशी पाठवून किडनी विकायला लावली. यातून सावकारी कर्जातून लोकांच्या फसवणुकीचे आणि छळ होत असल्याचे प्रकरण समोर आले आहे. माणुसकीला काळिमा फासणारे आणि सुसंकृत महाराष्ट्राची मान खाली घालण्याचे हे प्रकरण असल्याचे अतुल भातखळकर म्हणाले.

राज्य सरकारने या प्रकरणी कारवाई केली. एक समिती आणि एसआयटी नेमून अन्य राज्यातील या प्रकरणाची पाळेमुळे खणून काढण्यासाठी सरकार प्रयत्नशील आहे. मात्र, या प्रकरणातील काही आरोपींना जामीन मिळाला आहे. सावकारी नियमांच्या उल्लंघनासाठी गुन्हा दाखल असून आरोपींवर लावण्यात आलेली कलमे अत्यंत तकलादू आहेत. हे संघटित गुन्हेगारीचे प्रकरण असल्यामुळे या आरोपींवर 'मकोका'च लावायला हवा. त्यामुळे सरकार आरोपींवर 'मकोका' लावणार का असा प्रश्न अतुल भातखळकर यांनी सभागृहात विचारला. तसेच विशेष न्यायालयात फास्टट्रॅक खटला सुरू करून प्रकरणाचा निकाल लावणार का असा दुसरा प्रश्न आमदार भातखळकर यांनी उपस्थित केला आहे. सावकारी कर्जाच्या वितरणावर लक्ष ठेवण्यासाठी समिती अथवा भरारी पथके निर्माण करणार का असा सवालही अतुल भातखळकर यांनी विचारला आहे.

राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी या लक्ष्यवेधीवर उत्तर देताना म्हटले की, संबंधित घटना २०२१ ते २०२३ मधली असून शेतकऱ्याने सहा जणांकडून कर्ज घेतले होते. पुढे शेतकऱ्याला कर्जवसुलीसाठी त्रास देण्यात आल्यानंतर त्याने पोलिसांत तक्रार केली आणि २०२५ मध्ये प्रकरण उघडकीस आले. पोलिसांनी तातडीने सहा जणांना अटक केली. मात्र, दरम्यान कर्जवसुलीसाठी शेतकऱ्याच्या मागे तगादा लावल्याने त्याने स्वतःची किडनी विकून कर्ज परतफेड केले.

पुढे पंकज भोयर म्हणाले की, पोलिसांनी सखोल चौकशी केली असता लक्षात आले की, सोलापूरमधील एक इसमाने फेसबुकवर दोन अकाऊंट तयार केले– आधी किडनी डोनर आणि नंतर किडनी रिसिव्हर. यानंतर शेतकरी याच्या संपर्कात आला आणि सोलापूरचा इसम त्याला कंबोडियाला घेऊन गेला. शेतकऱ्याची किडनी विकून त्याला पैसे देण्यात आले. शेतकऱ्याने सहा लोकांचे कर्ज फेडण्याचा प्रयत्न केला मात्र तरीही सावकारांनी तगादा लावला. पुढे सहा जणांना अटक करण्यात आली. शिवाय सोलापूरच्या व्यक्तीसहित आणखी एकाला अशा आठ जणांना अटक झाली.

केवळ कंबोडिया येथे असे प्रकार सुरू नसून भारतात तामिळनाडूमधील एका रुग्णालयात देखील असा प्रकार होत असल्याचे उघडकीस आल्याचे पंकज भोयर म्हणाले. या प्रकरणी रुग्णालयाचा मालक आणि रुग्णालयात दिल्लीहून येणारा डॉक्टर यांच्यावर गुन्हा नोंदवण्यात आला आहे. मात्र, दोन्ही आरोपी फरार असून शोध सुरू आहे, अशी माहिती पंकज भोयर यांनी दिली. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणातील सहा आरोपींची मालमत्ता गोठवण्याचे निर्देश दिले आहेत. सावकारी कर्जावर लक्ष ठेवण्यासाठी समिती असल्याचे पंकज भोयर म्हणाले.

## घटनेचा व्हीडिओ व्हायरल

# मालेगाव महानगरपालिकेच्या वीज विभागात पढला गेला नमाज, सोमय्यांकडून आक्षेप



टीम न्यूज डंका महाराष्ट्र
newsdanka@gmail.com

मालेगाव येथे घडलेल्या एका वादग्रस्त घटनेने शहरात तसेच राज्यभरात चर्चेला तोंड फोडले आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये मालेगाव महानगरपालिकेच्या वीज विभागाच्या कार्यालयात नमाज अदा करण्यात आल्याचे दिसत आहे. या घटनेवरून विविध राजकीय प्रतिक्रिया उमटत असून भाजपाने कारवाईची मागणी केली आहे.

ही घटना शहरातील एका प्रभागातील दीर्घकाळ प्रलंबित असलेल्या वीज समस्येशी संबंधित असल्याचे सांगितले जात आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रारी आणि लेखी निवेदने देऊनही वीजपुरवठ्याचा प्रश्न सुटला नसल्याचा आरोप केला आहे.

या पार्श्वभूमीवर, संबंधित प्रभागातील नागरिकांनी लुकमान कमाल यांच्या नेतृत्वाखाली महापालिकेच्या वीज विभाग कार्यालयात आंदोलन छेडले. ते मालेगाव लोकसंघर्ष समितीचे अध्यक्ष आहेत.

दरम्यान, हा आंदोलनाचा दिवस रमजान महिन्यातील होता आणि असर नमाजची वेळ झाली होती. आंदोलनकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांना दुपारी ३ वाजता कार्यालयात बोलावण्यात आले होते; मात्र संबंधित अधिकारी बैठकीत असल्याचे सांगण्यात आले आणि ते उपस्थित झाले नाहीत.

लुकमान कमाल यांनी स्पष्टीकरण देताना म्हटले, "जर आम्ही नमाजसाठी बाहेर पडलो असतो, तर कार्यालय बंद झाले असते आणि दुसऱ्या दिवशीही वीज मिळाली नसती. त्यामुळे असर नमाज आम्ही कार्यालयातच अदा केली."

या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर झपाट्याने व्हायरल झाला आणि शहरात तीव्र चर्चा सुरू झाली. काही नागरिकांनी याला शांततापूर्ण आणि परिस्थितीजन्य आंदोलनाचे स्वरूप असल्याचे म्हटले, तर काहींनी सरकारी कार्यालयात धार्मिक विधी करणे योग्य आहे का, असा प्रश्न उपस्थित केला.

>> पान...५ वर